# प्रेसनोट

नाशिक,
दिनांक : २८/११/२०१८

**आलोसे सुधीर सोपान सांगळे, गृहपाल, अदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, घुलेवाडी, संगमनेर, ता.संगमनेर, जि.अहमदनगर यांना ३०,०००/— रूपये लाचेची रक्कम स्विकारतांना अटक**

---

यातील तक्रारदार यांचे पाण्याचे टॅंकर असून ते आदिवासी मुलांचे वसतिगृह, घुलेवाडी, संगमनेर येथे पाणी पुरवठा करतात. त्यांचे जुलै २०१८ ते ऑक्टोंबर २०१८ चे एकुण ९९,७१४/— रुपयाचे बिल तक्रारदार यांनी मंजुरीसाठी आलोसे सुधीर सोपान सांगळे, गृहपाल, अदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, घुलेवाडी, ता. संगमनेर, जि.अहमदनगर यांचेकडे दिले होते. सदर बिल आलोसे सांगळे यांनी मंजुर करवून त्याचा चेक तक्रारदार यांना दिल्याचे मोबदल्यात आलोसे यांनी दि.२८/११/२०१८ रोजी तक्रारदार यांना ६५,०००/—रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, नाशिक कार्यालयात तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीवरुन आज दिनांक २८/११/२०१८ रोजी ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करुन सापळा आयोजित केला असता आलोसे सुधीर सोपान सांगळे, गृहपाल, अदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, घुलेवाडी, ता.संगमनेर, जि.अहमदनगर यांनी तक्रारदार यांचेकडे ६५,०००/—रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेच्या रक्कमे पैकी ३०,०००/—रुपये लाचेची रक्कम घुलेवाडी, संगमनेर येथील अदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृहाचे गेटवर स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक तर्फे नागरीकांना आवाहन करण्यांत येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्रातील कार्यालयाशी संपर्क साधुन निर्भिडपणे या कार्यालयाकडे तक्रार नोंदवावी.

कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारीबाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल क्रमांक व दूरध्वनीवर संपर्क साधावा महाराष्ट्रातील सर्व जनतेच्या सोईच्या दृष्टीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यासाठी **लॅंडलाईन ते लॅन्डलाईन व मोबाईल ते लॅन्डलाईन अशी टोल फ्री नंबर १०६४** ची सेवा सुरु करण्यांत आली असुन सदर क्रमांकावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणालीसंबंधी व करावयाच्या तक्रारीसंबंधी नागरीकांनी संपर्क साधावा.

| अनं | युनिटचे नांव | दूरध्वनी क्रमांक | **टोल फ्री नंबर** |
|---|---|---|---|
| १ | नाशिक | ०२५३—२५७५६२८, २५७८२३० | **१०६४** |
| २ | अहमदनगर | ०२४१—२४२३६७७ | **१०६४** |
| ३ | धुळे | ०२५६२—२३४०२० | **१०६४** |
| ४ | नंदूरबार | ०२५६४—२३०००९ | **१०६४** |
| ५ | जळगांव | ०२५७—२२३५४७७ | **१०६४** |

( विश्वजीत जाधव )
वाचक पोलीस उपअधीक्षक
पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक करीता